# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या १६५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

## सोमवार, दि.०४ डिसेंबर, २०२३ दुपारी ०४:०० वा.

NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १६५ वी बैठक **सोमवार, दि. ०४ डिसेंबर, २०२३ रोजी दुपारी ०४:०० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| २) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ३) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ५) | प्रा. (डॉ.) बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ७) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ९) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १०) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १३) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १५) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १६) | डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई नामनिर्देशित) | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. शैलेंद्र देवळाणकर, मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | उपस्थित |
| १९) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | डॉ. मलिक सगाजी रोकडे प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष आणि व्यवस्थापन परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. तसेच खालील सदस्य पहिल्यांदाच बैठकीस उपस्थित असल्याने मा. कुलगुरुमहोदयांच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. शैलेंद्र देवळाणकर<br>मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), पुणे | २. | डॉ. विनोद मोहितकर<br>मा. संचालक (तंत्रशिक्षण), मुंबई |
| ३. | डॉ. श्रीमती नलिनी टेंभेकर<br>मा. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर | | |

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस श्री. अजित पाटणकर यांनी दुरध्वनीद्वारे अनुपस्थिती कळविली होती, त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | १) दि.२५ ऑक्टोबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६३ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांताची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>२) दि.०१ नोव्हेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६४ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांताची नोंद घेण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | दि.२५ ऑक्टोबर, २०२३ झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६३ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह सर्वानुमते वाचून कायम करण्यात आला. | |
| | १) पान क्र. १७ व विषय क्र.१२ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | |
| | पूर्वीचा ठराव | |
| | डॉ. वैंशपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्याकडून विद्यापीठास डोनेशन स्वरुपात देवू केलेले विविध ग्लो मॉडेल्स, ग्लो बोर्डस विद्यापीठाच्याच एखाद्या संकुलात ठेवण्याच्या अटीच्या अधीन राहून स्विकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | डॉ. वैंशपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्याकडून विद्यापीठास डोनेशन स्वरुपात देवू केलेले विविध ग्लो मॉडेल्स, ग्लो बोर्डस स्विकारुन ते विज्ञान केंद्र, सोलापूर येथे ठेवण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | दि.०१ नोव्हेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६४ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते वाचून कायम करण्यात आला. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | दि.१५ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६२ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | दि.१५ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६२ व्या तातडीच्या बैठकीतील कार्यवृत्तांतानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) मधील तरतुदीनुसार संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठास मंजूर असलेल्या संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण या पदावर कार्यरत असलेल्या डॉ. सुरेश किसनराव पवार हे नियत वयोमानानुसार दि.३१/०८/२०२२ रोजी सेवानिवृत्त झाल्याने त्यांना दि.३१/०८/२०२२ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण या पदावरुन सेवामुक्त करण्यात आले होते. त्यामुळे रिक्त झालेल्या संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण या पदाची जाहिरात दि.१९/११/२०२२ रोजीच्या दैनिक लोकमत, दैनिक दिव्य मराठी, लोकसत्ता वेस्टर्न पॅकेज, Association of Indian Universities, New Delhi यांच्या आवृत्तीमध्ये तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या su.digitaluniversity.ac व महाराष्ट्र शासनाच्या Maharashtra.gov.in संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आली होती.<br>सदर जाहिरातीस अनुसरुन विहीत कार्यवाहीअंती पात्र झालेल्या उमेदवारांनी मुलाखत घेणेकामी निवड समिती सदस्यांचा नामनिर्देशनाबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार व्यवस्थापन परिषदेने दि.२१/०२/२०२३ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.०२ अन्वये प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे यांचे दि.१५/१०/२०२३ रोजी निधन झाल्याने निवड समितीवर दुसऱ्या सदस्याचे नामनिर्देशन घ्यावे लागणार आहे.<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५(२) (ड) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद नमूद आहे.<br>• व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक<br>उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण पदाच्या निवड समितीवर नामनिर्देशित सदस्य प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे यांचे निधन झाल्याचे त्यांच्या ऐवजी उक्त नमूद तरतुदीला अनुसरुन संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांचे व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) मधील तरतुदीनुसार संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) मधील तरतुदीनुसार संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समाधान दिगंबर पवार यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [०४] | **मा. कुलगुरु यांनी दि.२२/११/२०२३ रोजी दिलेल्या आदेशानुसार प्रस्तुत विभागाकडून प्रस्तुत विद्यापीठाचे तत्कालीन संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ डॉ. श्रीकांत कोकरे यांना परीक्षाधीन कालावधीमध्ये दि. ०९/१२/२०१९ रोजीच्या कार्यालयीन आदेशाद्वारे पदावरुन बडतर्फ केल्यानंतर त्यांनी विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांच्याकडे अपील क्र. ०१/२०२० दाखल केलेली होती. सदर अपीलात दि. १६/१०/२०२३ रोजी पारित करण्यात आलेल्या आदेशाच्या अनुषंगाने प्रस्तावित कार्यवाहीची बाब सादर.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाचे तत्कालीन संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ डॉ. श्रीकांत कोकरे यांना प्रस्तुत विद्यापीठाने परीक्षाधीन कालावधीमध्ये दि.०९/१२/२०१९ रोजीच्या कार्यालयीन आदेशाद्वारे पदावरुन बडतर्फ करण्यात आलेले आहे. सदर आदेशाविरुध्द डॉ. कोकरे यांनी विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांच्याकडे अपील क्र.०१/२०२० ची दाखल केलेली होती. सदर अपीलाचा निकाल दि.१६/१०/२०२३ रोजी जाहीर करण्यात येऊन, विद्यापीठाने दि.०९/१२/२०१९ रोजी दिलेले सेवासमाप्तीचे आदेश रद्द करण्यात येऊन, डॉ.कोकरे यांना प्रस्तुत विद्यापीठाच्या संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ या पदावर दोन महिन्याच्या कालावधीत रुजू करुन घेण्याबाबत आदेश पारित करताना त्यांना सेवा सातत्यता, मागील वेतन इ. अदा करण्याबाबत व अपीलाच्या खर्चापोटी विद्यापीठाने डॉ. कोकरे यांना ₹१०,०००/- अदा करण्याबाबत आदेश पारित केलेले आहे.<br>या प्रकरणी ॲड. सलगर यांनी दि.२०/१०/२०२३ रोजी सदर अपीलामध्ये विद्यापीठाने उपस्थित केलेले विविध मुद्दे यांच्या अनुषंगाने सदर निकालामध्ये मे.न्यायाधिकरणाने उत्तर व Explain केलेले नाही. सदर मुद्दे हे या प्रकरणाच्या निकालाकरिता महत्वाचे आहेत. त्याचप्रमाणे विद्यापीठाने विविध न्यायालयाचे Citation देखील सदर प्रकरणी दाखल करण्यात आलेले होते, त्याचाही Explanation निकालात दिसून येत नाही.<br>सदर अपीलामध्ये डॉ. कोकरे यांच्या बडतर्फीमुळे रिक्त झालेले पद भरण्यात आल्याबाबत विद्यापीठाने मे. न्यायाधिकरणास कळविलेले होते, तरी परंतु तत्कालीन वेळी नियुक्त संचालकांना सदर अपीलामध्ये Party करण्यात आलेले नाही, याचा उल्लेख इ. निकालात दिसून येत नाही. त्याचप्रमाणे मे.न्यायाधिकरणाने मागील वेतनासंदर्भात दिलेले आदेश Wrongly directed to pay असे नमूद करुन त्याचप्रमाणे सदर प्रकरणी विद्यापीठाने दाखल केलेली FIR व त्या अनुषंगाने दाखल करण्यात आलेली चार्जशिट ज्यामध्ये डॉ. कोकरे यांचा उल्लेख आहे, या महत्वाच्या बाबींचा उल्लेख सदर निकालात दिसून येत नाही. या व इतर बाबी नमूद करुन या प्रकरणी सदर अपील क्र.०१/२०२० मध्य पारित करण्यात आलेल्या आदेशास मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देणेकरिता Fit केस असल्याचे नमूद करुन कळविलेले आहे. सदर आदेशास मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका (Writ Petition) दाखल करुन आव्हान देता येईल, असे कळविलेले आहे. | कायदा विभाग |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| | या प्रकरणी डॉ. कोकरे यांना प्रस्तुत विद्यापीठातून कार्यमुक्त करण्यात आल्यानंतर त्यांनी त्यांच्या सेवेविषयी मे. पीठासन अधिकारी विद्यापीठ व महाविद्यालय, न्यायाधिकरण, पुणे यांच्याकडे दि.१३/०६/२०२३ रोजी सादर केलेले शपथपत्र सोबत जोडण्यात आलेले आहे. त्यानुसार प्रस्तुत विद्यापीठातून बडतर्फ करण्यात आल्यानंतर त्यांनी राजे रामराव महाविद्यालय, जत, जि. सांगली येथे दि.१०/१२/२०१९ रोजी रुजू झाल्याबाबत नमूद करुन सदर महाविद्यालयाने त्यांना वेतन दिलेले नाही, तसेच दि.३१/०३/२०२२ पर्यंत Suspension Allowance दिलेले नाही, असे नमूद करुन दि.०१/०४/२०२२ ते दि.१०/०८/२०२२ पर्यंत Subsistence Allowance पोटी ₹२,८४,६६८/- इतकी रक्कम अदा करण्यात आलेली असल्याबाबत नमूद करुन त्यांना दि.११/०८/२०२२ रोजी सेवेतून बडतर्फ करण्यात आल्याबाबत व इतर मुद्दे नमूद करुन शपथपत्र दाखल केलेले आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाचे तत्कालीन संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ डॉ. श्रीकांत कोकरे यांना परीक्षाधीन कालावधीमध्ये दि.०९/१२/२०१९ रोजीच्या कार्यालयीन आदेशाद्वारे पदावरुन बडतर्फ केल्यानंतर त्यांनी विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांच्याकडे अपील क्र.०१/२०२० दाखल केलेली होती. सदर अपीलात दि.१६/१०/२०२३ रोजी पारित करण्यात आलेल्या आदेशाच्या अनुषंगाने प्रस्तावित कार्यवाहीची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांनी अपील क्र.०१/२०२० वर पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.**<br>१) श्री. सुधाकर तुकाराम सरवदे - अध्यक्ष<br>२) योगिनी घारे, कुलसचिव - सदस्य<br>३) डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर - सदस्य<br>४) श्री. सचिन मारुती गायकवाड - सदस्य<br>५) ॲड. एस. व्ही. उजळंबे - सदस्य<br>६) ॲड. प्रविण शेंडे - सदस्य<br>७) ॲड. जावेद खैरदी, कायदा अधिकारी - सदस्य सचिव<br>वरील समितीने दि.०८/१२/२०२३ पर्यंत याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करावा. समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार मा. कुलगुरु महोदय यांना सर्वानुमते देण्यात आले. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०५ ] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या प्र-कुलगुरु यांची नियुक्ती करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या रिक्त असणाऱ्या प्र-कुलगुरु पदी नियुक्ती करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३ पोटकलम (६) ऐवजी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार दि.२४ नोव्हेंबर, २०२२ मध्ये अ. क्र. ७ अन्वये खालीलप्रमाणे सुधारणा केलेली आहे:<br>"(६) प्र-कुलगुरु म्हणून एखाद्या व्यक्तीची व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करणे हा, कुलगुरुचा विशेषाधिकार असेल. व्यवस्थापन परिषद, कुलगुरूच्या शिफारशीवरुन, विद्यापीठासाठी प्र-कुलगुरूची नियुक्ती करील."<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या प्र-कुलगुरु यांची नियुक्ती करण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या रिक्त असणाऱ्या प्र-कुलगुरु पदी नियुक्ती करण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार, दि.२४ नोव्हेंबर, २०२२ मधील अ.क्र.७ मध्ये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३ पोटकलम ६ च्या सुधारणेन्वये मा. कुलगुरु यांना प्रदान केलेल्या विशेषाधिकार नुसार मा. कुलगुरु यांनी डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा यांची प्र-कुलगुरु पदाच्या नियुक्तीसाठी केलेल्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [६(१)] | **दि.०८/११/२०२३ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.०८/११/२०२३ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**<br>टिपणी: दि.०८/११/२०२३ रोजी झालेल्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No.S.३२४ नुसार वित्त व लेखा समिती व व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे.<br>सबब, दि.०८/११/२०२३ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.०८/११/२०२३ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | **दि.०८/११/२०२३ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.०८/११/२०२३ रोजीच्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [६(२)] | **माहिती व तंत्रज्ञान मंडळाची दि.०२/१२/२०२३ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**<br><br>टिपणी: विविध प्रणाली व सर्व्हर खरेदी करण्याकरीता दि.०२/१२/२०२३ रोजी माहिती व तंत्रज्ञान मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार विविध प्रणाली व सर्व्हर खरेदी प्रक्रिया सुरु करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.<br><br>सबब, माहिती व तंत्रज्ञान मंडळाची दि.०२/१२/२०२३ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ. | माहिती व तंत्रज्ञान मंडळ |
| ठराव: | **माहिती व तंत्रज्ञान मंडळाची दि.०२/१२/२०२३ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच निविदा प्रसिध्द करतेवेळी सदर निविदेमध्ये खालील अटींचा ही समावेश करण्यात यावा.**<br>**१) जुन्या सर्व सॉफ्टवेअरमधून नवीन सॉफ्टवेअरमध्ये माहितीचे स्थलांतर करता यावे.**<br>**२) डेटाच्या सुरक्षेबाबतची जबाबदारी ही पूर्णत: सदर कंपनीची असेल.**<br>**३) सदर सॉफ्टवेअर खरेदीची संपूर्ण प्रक्रिया ही शासन नियमानुसार करण्यात यावी.** | |

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर ★ NAAC Accredited-2022 B++ Grade (CGPA-2.96)

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [६(३)] | **शास्त्रीय उपकरण केंद्राकडे आवश्यक असणारे Field Emission Scanning Electron Microscopy with EDS (FESEM with EDS) या उपकरणाची खरेदी करण्याकरीता Additional cost of २ years warranty for FESEM with EDS instrument (४th year and ५th year) साठी वाढीव INR ३५,०००००/- + GST extra देण्याच्या मान्यतेस्तव.**<br>टिपणी: शास्त्रीय उपकरण केंद्राकडे आवश्यक असणारे Field Emission Scanning Electron Microscopy with EDS (FESEM with EDS) या उपकरणाची खरेदी करण्याकरीता प्रक्रिया सक्षम मान्यतेनुसार ई- निवीदा मागविण्याची संपूर्ण प्रक्रिया खरेदी व भांडार (वित्त व लेखा) विभागाकडून करण्यात आली होती. उपरोक्त विभागाने प्रशासकीय मान्यतेने Financial Bid opening ची प्रक्रिया करून M/s.Labindia Instruments Pvt. Ltd, Thane यांची निविदा न्युनत्तम दर (L१) रू.२,७५,२७,९८९/- इतकी निश्चित केले आहे. तथापी २ years warranty (४th year and ५th year) संदर्भात चर्चा केली असता मुळ किमतीत वाढीव INR ३५,०००००/- +GST extra Additional cost करून (४th year and ५th year) Warranty देण्याची M/s.Labindia Instruments Pvt. Ltd, Thane यांनी ई-मेल व्दारे कळविले आहे.<br>सबब, शास्त्रीय उपकरण केंद्राकडे आवश्यक असणारे Field Emission Scanning Electron Microscopy with EDS (FESEM with EDS) या उपकरणाची खरेदी करण्याकरीता Additional cost of २ years warranty for FESEM with EDS instrument (४th year and ५th year) साठी मुळ किमतीत वाढीव INR ३५,०००००/- +GST extra. देण्याची बाब विचारार्थ. | **शास्त्रीय उपकरण केंद्र** |
| ठराव: | **सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आला.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [६(४)] | **स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर या महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी दिनांक १३/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ ते २०३३-२०३४ या दहा वर्षांच्या कालावधीकरिता स्वायत्त महाविद्यालय म्हणून मान्यता दिलेली आहे. त्याचप्रमाणे सदर मान्यता पत्रात ३० दिवसांपर्यंत विद्यापीठानेही मान्यता देणेबाबत सूचित केल्याने, सदरची बाब तातडीची असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) मधील तरतुदीनुसार मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात विद्यापरिषदेच्या वतीने शिफारस केल्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: दिनांक २९/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्राचार्य, स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १३/११/२०२३ रोजीच्या पत्राचा संदर्भ देवून महाविद्यालयाच्या स्वायत्तता संदर्भात विद्यापीठाची अधिसूचना निर्गमित करणेबाबत विनंती केली आहे.<br>सदर प्रकरणी प्राचार्य, स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर यांनी दिनांक ३१/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये महाविद्यालयाचा स्वायत्ततेचा प्रस्ताव सादर केले होते. सदरील प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२२ व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकषानुसार विद्या परिषदेच्या दिनांक १५/११/२०१७ रोजीच्या बैठकीत सादर केले असता, त्यावर विद्या परिषदेने ठराव क्र. ४८ वर खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.<br>"श्री. विठ्ठल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च इंस्टिटयूट संचलित, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पंढरपूर या महाविद्यालयाकडून स्वायत्त दर्जा मिळण्याकरिता प्राप्त झालेला प्रस्ताव स्विकारुन व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस करण्यात आली."<br>दिनांक १५/११/२०१७ रोजीच्या बैठकीत विद्या परिषदेने केलेली शिफारस दिनांक ०७/०२/२०१८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर केली असता, त्यावर व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र. ०६ वर खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.<br>" श्री. विठ्ठल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पंढरपूर या महाविद्यालयाकडून स्वायत्त दर्जा मिळण्यासंदर्भात विद्या परिषदेने केलेली शिफरस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली"<br>दिनांक ०७/०२/२०१८ रोजीच्य बैकीत व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठाचे पत्र क्र. SUS/Affiliation/२०१८/१९६०, दिनांक ०९/०३/२०१८ अन्वये मा. सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता.<br>त्या अनुरोधाने विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ३१/०७/२०२३ अन्वये विद्यापीठाचे ना-हरकत संदर्भात ई-मेलद्वारे कळविले होते. त्यानुसार विद्यापीठाकडून पत्र क्र. PAHSUS/ Affiliation/Autonomous/२०२३/५७३३, दिनांक ०४/०९/२०२३ अन्वये ना-हरकत संदर्भात कळविण्यात आले होते. तद्नंतर विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी त्यांचे पत्र क्र. F.२-१०/२०२३(AC-Policy), दिनांक १३/११/२०२३ अन्वये स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर या महाविद्यालयास | संलग्नता विभाग |

| | | |
|---|---|---|
| | शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ ते २०३३-२०३४ या दहा वर्षांच्या कालावधीकरिता स्वायत्त दर्जा दिला असल्याचे कळविले आहे. त्याचप्रमाणे मान्यता मिळाल्यापासून ३० दिवसांपर्यंत उक्त महाविद्यालयास विद्यापीठाने स्वायत्त महाविद्यालय म्हणून मान्यता देणेबाबत सूचित केले आहे (सोबत पत्र जोडले आहे). त्यासंदर्भात प्राचार्य, स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर यांनी त्यांचे पत्र क्र. COEPR/२०२३-२०२४/७५३, दिनांक २९/११/२०२३ अन्वये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १३/११/२०२३ रोजीच्या पत्राचा संदर्भ देवून महाविद्यालयाच्या स्वायत्तता संदर्भात विद्यापीठाची अधिसूचना निर्गमित करणेबाबत विनंती केली आहे.<br>विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १३/११/२०२३ अन्वये सूचित केल्याप्रमाणे स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर या महाविद्यालयास ३० दिवसांच्या कालावधीत मान्यतेसंदर्भात अधिसूचना काढावी लागणार आहे. सदरील अधिसूचना काढण्यापूर्वी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२२ मधील तरतूदीनुसार सदरची बाब विद्यापरिषदेच्यासमोर सादर करावी लागणार आहे. तथापि, विद्या परिषदेची बैठक नियोजित नसल्याने, वेळेअभावी तातडीची बाब असल्याने मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) मधील तरतूदीनुसार विद्यापरिषदेच्या वतीने प्रशासकीय कार्यवाही करण्यास दिनांक ०२/१२/२०२३ रोजीच्या कार्यालयीन टिपणीस मान्यता दिलेली आहे.<br>सबब, स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर या महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी दिनांक १३/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ ते २०३३-२०३४ या दहा वर्षांच्या कालावधीकरिता स्वायत्त महाविद्यालय म्हणून मान्यता दिलेली आहे. त्याचप्रमाणे सदर मान्यता पत्रात ३० दिवसांपर्यंत विद्यापीठानेही मान्यता देणेबाबत सूचित केल्याने, सदरची बाब तातडीची असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) मधील तरतुदीनुसार मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात विद्यापरिषदेच्या वतीने शिफारस केल्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर या महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी दिनांक १३/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ ते २०३३-२०३४ या दहा वर्षांच्या कालावधीकरिता स्वायत्त महाविद्यालय म्हणून मान्यता दिलेली आहे. त्याचप्रमाणे सदर मान्यता पत्रात ३० दिवसांपर्यंत विद्यापीठानेही मान्यता देणेबाबत सूचित केल्याने, सदरची बाब तातडीची असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) मधील तरतुदीनुसार मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात विद्यापरिषदेच्या वतीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

डॉ. सुशिल कुमार शिंदे यांनी खालीलप्रमाणे विषय सादर केला.

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [६(५)] | विविध विषयांसाठी RRC चे गठण अद्याप झाले नसल्याने, अनेक पीएच. डी. विद्यार्थ्यांना त्यांचे शोधप्रबंध तपासणीसाठी पाठविता येत नसल्याने, RRC च्या वतीने मा. कुलगुरु महोदयांनी पीएच. डी. शोधनिबंध तपासणीसाठीची सर्व प्रक्रिया पार पाडली जावी यासाठी विशेष बाब म्हणून RRC च्या वतीने सर्व अधिकार मा. कुलगुरु महोदय यांच्याकडे देण्याची बाब विचारार्थ. | पीएच. डी. विभाग |
| ठराव: | मा.प्र-कुलगुरु यांची नियुक्ती झाली असल्याने त्यांनी लवकरात लवकर कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले. | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद